| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHDH050012692019 | दाखल दिनांक | : | ०३/०९/२०१९ | | |
| | नोंदणी दिनांक | : | ०३/०९/२०१९ | | |
| | निकाल दिनांक | : | २३/०३/२०२६ | | |
| | कालावधी | : | **वर्ष** | **महिने** | **दिवस** |
| | | | **०६** | **०६** | **२०** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्रमांक २), साक्री यांचे न्यायालयात**
**( न्यायीक अधिकारी – मिलिंद रा. गाढवे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. ११२/२०१९**
**निशाणी क्रमांक :– ३४/ब**

**साक्री पोलीस स्टेशन यांची पहिली खबर क्रमांक ७१/२०१९**
**(गुन्हा : भा.द.वि.क. – ३५४, ४५२, ५०४ प्रमाणे)**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादीचे नाव | | **सरकारतर्फे**<br>साक्री पोलीस स्टेशन, ता. साक्री जि. धुळे. |
| प्रतिनिधीत्व | | **श्री. अतुल डी. जाधव, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** |
| आरोपींचे नाव | | **विष्णु देवराम गायकवाड,**<br>वय – ३० वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे. |
| प्रतिनिधीत्व | | **श्री. एस.आय.मावळी, आरोपीतर्फे विधिज्ञ** |

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०९/०४/२०१९ |
| फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | ०९/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | ०३/०९/२०१९ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०३/०९/२०१९ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०७/०३/२०२६ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| निकाल दिनांक | २३/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | निरंक |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याचा दिनांक | आरोपीस जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप | निर्दोष /दोषी | किती शिक्षा सुनविण्यात आली | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **विष्णु देवराम गायकवाड,** | अति. जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे यांचेकडील आदेशान्वये अटक पुर्व जामिनावर | ०३/०९/२०१९ | भा.द.वि. कलम ३५४, ४५२ व ५०४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

**–: <u>न्यायनिर्णय</u> :–**

**( घोषणा दिनांकः– २३ मार्च, २०२६ )**

आरोपीविरुध्द सदर खटला भा.द.वि.क– ३५४, ४५२ व ५०४ प्रमाणे अन्वये दोषारोप सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

२) **अभियोगपक्षाचे संक्षिप्त म्हणणे येणेप्रमाणे –**

फिर्यादी सुनिता सुरसिंग अहिरे यांनी समक्ष साक्री पोलिस स्टेशन येथे दिनांक ०९/०४/२०१९ रोजी हजर राहून फिर्याद लिहून दिली की, त्या म्हसदी येथे राहतात व त्यांचे वडिल हे मजुरी करुन परिवाराचा उदरनिर्वाह करतात व घटनेच्या वेळी त्या नाशिक येथील श्रीराम नर्सिंग कॉलेज येथे शेवटच्या वर्षाला शिक्षण घेत होत्या.

३) पुढे त्यांचे असे कथन आहे की, त्यांचे घराचे मागे विष्णु देवराम गायकवाड हा राहतो व त्यास ते ओळखतात व त्या नाशिक येथुन म्हसदी येथे घरी आल्यावर त्यांना तो सुमारे दोन वर्षापासुन त्रास देत होता व तो त्यांना सांगत होता की, मला तु आवडते, तु माझ्याशी लग्न कर परंतु त्यांचे शिक्षण चालु असल्याने ते त्याला काही बोलत नव्हत्या. त्यावेळी त्या त्याला सांगत होत्या की, तुझे लग्न झालेले आहे, तु तुझे आयुष्य जग व मला माझे आयुष्य जगु दे परंतु तो त्यांना त्या कारणावरुन वाईट वाईट शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी देत होता. दिनांक २३/०३/२०१९ रोजी रात्री ०८.०० वाजेच्या सुमारास त्या

किराणा दुकानावर तेल घेण्यासाठी गेल्या असता विष्णु व त्याची पत्नी राधिका असे आले व त्यांना म्हणाले की, तु वेश्या आहे, तु बाहेरुन पैसे कमवुन आणते असे बोलुन त्यांना हाताबुक्क्यांनी मारहाण केली व त्यावेळी त्यांनी त्याच्याविरुध्द साक्री पोलिस स्टेशनला तक्रारी अर्ज दिला होता व पोलिसांनी त्याला बोलावुन त्याने त्यांची माफी मागितली व त्याची आई व त्यांच्या गावातील सरपंच व प्रतिष्ठीत लोकांनी त्यांच्यामध्ये समझोता घडवुन आणला होता व म्हणुन त्यांनी त्याच्याविरुध्दची तक्रार मागे घेतली होती.

४) पुढे त्यांचे असे कथन आहे की, दिनांक ०८/०४/२०१९ रोजी रात्री ०९.०० वाजेच्या सुमारास ते त्यांचे आई वडिल व भाऊ असे घरात होते तेव्हा विष्णु हा दारु पिवुन त्यांच्या घरात घुसून आला व त्यांना बोलु लागला की, तु माघार घेतली माझे काय वाकडे झाले असे त्यांना व त्यांच्या आई वडिलांना वाईट वाईट शिवीगाळ करु लागला त्यावेळी त्यांनी त्याला सांगितले की, तुझ्या आईकडे बघुन अर्ज मागे घेतला त्यावेळी त्याने त्याचा हात पकडुन त्यांना जवळ ओढुन त्यांना लज्ञा वाटेल असे कृत्य करुन त्यांचा विनयभंग केला तेव्हा त्यांनी त्याचा हात झटकला व त्यांच्या आईकडे गेल्या व त्यावेळी तो त्यांना बोलला की, मी तुझे लग्न होवु देणार नाही व त्यानंतर तो तेथून निघुन गेला व त्याच्याविरुध्द पुढील कार्यवाही व्हावी म्हणुन त्यांनी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

५) अशा फिर्यादीच्या तक्रारीवरुन साक्री पोलिस स्टेशन, ता. साक्री जि. धुळे यांनी गु.र.नं. ७१/२०१९ नोंदविला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला, आरोपीस सी.आर.पी.सी. कलम ५० प्रमाणे नोटिस दिली, आरोपीचा अटक पंचनामा तयार केला, आरोपीताचे नातेवाईकांना अटकेबाबत लेखी समज दिली व तपासाअंती आरोपींविरुध्द तपासी अधिकारी यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

६) आरोपीविरुध्द माझे पुर्वाधिकारी यांनी दोषारोप निशाणी क्रमांक १५ नुसार निश्चित केले. त्यानुसार आरोपीने गुन्हा कबुल न करता सदरचा खटला चालवण्यास संमती दर्शविली. अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये गुन्हा सिध्द करणारे साक्षीपुरावे आल्यामुळे आरोपीचे फौ.प्र. सहिंतेच्या कलम ३१३ (१)(ब)/बी.एन.एस.एस.

कलम ३५१ नुसार जबाब निशाणी क्रमांक ३३ अन्वये नोंदविण्यात आला. त्यात त्याने त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला.

७) खटलेदारांचे कथानक, समोर आलेला पुरावा तसेच दोन्ही पक्षांचा युक्तीवाद इत्यादी गोष्टींचा उहापोह व अवलोकन केले असता खटल्याच्या निराकरणार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या मुद्दयांना मी माझे निष्कर्ष व कारणमिमांसासह खालील प्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८/०४/२०१९ रोजी रात्री ०९.०० वाजता म्हसदी गावाचे शिवारात फिर्यादी तिचे घरात तिचे आई, वडिल, भाऊ घरात असतांना आरोपी त्यांच्या घरात घुसून गेला व फिर्यादीचा हात पकडून तिला जवळ ओढुन तिला लज्जा वाटेल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | – नाही. |
| २. | उपरोक्त वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या आई वडिलांच्या राहत्या घरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने अनाधिकाराने गृह अपप्रवेश केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | – नाही. |
| 3. | उपरोक्त वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने सार्वजनिक शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन तु माघार घेतली माझे काय वाकडे झाले व मी तुझे लग्न होवु देणार नाही असे बोलुन फिर्यादीस व तिच्या आई वडिलांना वाईट वाईट शिवीगाळ केली असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | – नाही. |
| ४. | कोणता आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## का र ण मि मां सा व नि ष्क र्ष

८) अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द दोष सिध्दतेकरता एकुण ४ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १. भगवंत तुळशीराम देवरे, साक्षीदार क्र. २ सुनिता सुरसिंग

अहिरे, साक्षीदार क्र. ३ कमलबाई सुरसिंग अहिरे व साक्षीदार क्र. ४ सुरसिंग किसन अहिरे यांना अनुक्रमे पि.सा.क्र.१/ निशाणी क्रमांक २३, पि.सा.क्र.२/निशाणी क्रमांक २८, पि.सा.क्र.३/ निशाणी क्रमांक ३१ तर पि.सा.क्र.४/निशाणी क्रमांक ३२ प्रमाणे तपासण्यात आले. दोन्ही पक्षातर्फे अंतिम युक्तीवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ च्या संदर्भातः–</u>**

९) मुद्दा क्रमांक १ ते ३ एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे आणि अभिलेखावर पुरावा हा संयुक्तीकरित्या आला असल्याने मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतचे विवेचन एकत्रीतरित्या घेतले आहे.

१०) अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ भगवंत तुळशीराम देवरे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०९/०४/२०१९ रोजी दुपारी १६.०५ वाजेच्या सुमारास पोलिसांनी त्यांना म्हसदीच्या बसस्टॅण्डवर घटनास्थळ पंच म्हणुन बोलाविले होते. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, त्या ठिकाणी पोलिसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली होती. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावर अनुक्रामंक १ वर नि.क्र.२४ ची सही केली. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षाद्वारे त्याची उलटतपासणी घेण्यात आली परंतु त्यात देखील अभियोगपक्ष अभिलेखावर काहीही आणु शकला नाही.

११) अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. २ सुनिता सुरसिंग अहिरे (मुळ फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २३/०३/२०१९ ते ०८/०४/२०१९ रोजी काय घटना घडल्या होत्या हे त्यांना आता आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांनी फिर्याद दाखल केली होती किंवा कसे हे त्यांना आता आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, असे काही झाले नव्हते की, आरोपी हा त्यांचा पाठलाग करायचा व त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करायचा व त्यांचा हात ओढुन त्यांना लज्जा वाटेल असे कृत्य केले होते. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांनी दिलेल्या फिर्यादीवर नि.क्र. २९ वरील सही केली. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यातील

मजकूर त्यांना माहित नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, फिर्याद दाखल केल्यानंतर त्यांचा न्यायालयात जबाब घेतला किंवा कसे हे त्यांना आता आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांनी न्यायालयात दिलेल्या जबाबावर नि.क्र. ३० वरील सही केली. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षाद्वारे त्याची उलटतपासणी घेण्यात आली परंतु त्यात देखील अभियोगपक्ष अभिलेखावर काहीही आणु शकला नाही. तसेच अभियोगपक्षाच्या उलटतपासणीत त्याने आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले.

१२) अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ३ कमलबाई सुरसिंग अहिरे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, फिर्यादी सुनिता ही त्यांची मुलगी आहे. पुढे त्यांनी असे कथन केले की, दिनांक २३/०३/२०१९ व दिनांक ०८/०४/२०१९ रोजी काय घटना घडल्या होत्या हे त्यांना आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला होता परंतु त्यातील मजकूर त्यांना आता आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, असे काही झाले नव्हते की, आरोपी हा त्यांच्या मुलीचा पाठलाग करत होता व तिचा हात पकडून तिला लज्जा वाटेल असे कृत्य केले होते. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षाद्वारे त्याची उलटतपासणी घेण्यात आली परंतु त्यात देखील अभियोगपक्ष अभिलेखावर काहीही आणु शकला नाही. तसेच अभियोगपक्षाच्या उलटतपासणीत त्याने आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले.

१३) अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ४ सुरसिंग किसन अहिरे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, फिर्यादी सुनिता ही त्यांची मुलगी आहे. पुढे त्यांनी असे कथन केले की, दिनांक २३/०३/२०१९ व दिनांक ०८/०४/२०१९ रोजी काय घटना घडल्या होत्या हे त्यांना आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला होता परंतु त्यातील मजकूर त्यांना आता आठवत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, असे काही झाले नव्हते की, आरोपी हा त्यांच्या मुलीचा पाठलाग करत होता व तिचा हात पकडून तिला लज्जा वाटेल असे कृत्य केले होते. सदर साक्षीदाराने

अभियोग पक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षाद्वारे त्याची उलटतपासणी घेण्यात आली परंतु त्यात देखील अभियोगपक्ष अभिलेखावर काहीही आणु शकला नाही. तसेच अभियोगपक्षाच्या उलटतपासणीत त्याने आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले.

१४) न्यायालयाचा मुख्य उद्देश हा केवळ आरोपांवर आधारित शिक्षा ठोठावणे नसुन न्यायपध्दतीने आणि सिध्द पुरांव्याच्या आधारे दोष सिध्द झाल्यानंतरच आरोपीला शिक्षा देणे हा असतो. भारतीय फौजदारी न्याय व्यवस्थेमध्ये "दोषसिध्द होईपर्यंत आरोपी निर्दोष" हे तत्व अत्यंत मुलभुत आहे. या प्रकरणात फिर्यादी, फिर्यादीचे वडिल व फिर्यादीची आई हे मुख्य आणि थेट साक्षीदार होते. मात्र न्यायालयात साक्ष देतांना त्यांनी पोलिस तपासात दिलेल्या जबाबांपासुन पुर्णपणे वळन घेतले. त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये दिनांक ०८/०४/२०१९ रोजी रात्री ०९.०० वाजता म्हसदी गावाचे शिवारात फिर्यादीच्या घरात तिचे आई, वडिल, भाऊ घरात असतांना आरोपीने त्यांच्या घरात घुसला व फिर्यादीचा हात पकडून तिला जवळ ओढुन तिला लज्ञा वाटेल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला तसेच आरोपीने फिर्यादीच्या आई वडिलांच्या राहत्या घरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने अनाधिकाराने गृह अपप्रवेश केला तसेच आरोपीने सार्वजनिक शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन तु माघार घेतली माझे काय वाकडे झाले व मी तुझे लग्न होवु देणार नाही असे बोलुन फिर्यादीस व तिच्या आई वडिलांना वाईट वाईट शिवीगाळ केली हे सर्व आरोप नाकारले. न्यायालयाच्या मते जेंव्हा फिर्यादी, फिर्यादीचे वडिल व फिर्यादीची आई हे स्वतःच त्यांचा पुर्वीचा आरोप नाकारतात तेंव्हा त्यांचा आरोपपत्रावरील जबाब सिध्द होऊ शकत नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या उलटतपासामध्ये जर आरोपींविरुध्द कोणतीही ठोस बाब समोर येत नसेल तर फक्त तपासात दिलेला जबाब गृहीत धरुण आरोपींना शिक्षा ठोठावणे न्यायोचीत होणार नाही.

१५) अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. जरी गुन्हा तडजोड पात्र नसला तरी साक्षीदारांचा साक्षीपुरावा आणि तडजोडीचा दस्तऐवज न्यायालयाच्या निर्णयावर प्रभाव टाकतात. मा. नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या ***" Gian Singh Vs. State of Punjab, AIR 2012 SC 2577 "*** यामध्ये कौटुंबिक व खाजगी स्वरुपाच्या फौजदारी प्रकरणांमध्ये तडजोड झाल्यास

न्यायालयाने काय भुमिका घ्यावी याबाबत स्पष्ट मार्गदर्शन दिले आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये परिच्छेद क्र. ६१ मध्ये असे सांगितले आहे की ***"जरी एखादा गुन्हा तडजोडीयोग्य नसेल तरीही जर सबंधीत पक्षकारांनी आपआपसात तडजोड केली असेल आणि ती तडजोड प्रामाणिक व पारदर्शक स्वरुपाची असल्याचे न्यायालयास वाटल्यास सदर खटल्याची कार्यवाही सदर खटला न्यायालय स्वतःच्या अधिकाराचा वापर करुन रद्द करु शकते. कारण अश्या परिस्थितीत न्यायाच्या तत्वांचे संरक्षण करणे आणि न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर टाळणे महत्वाचे ठरते ".*** सदर प्रकरणात फिर्यादी व अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी साक्षीपुराव्यांमध्ये त्यांमध्ये तडजोड झाल्याचे मान्य केले असल्यामुळे सदर प्रकरणात आरोपींविरुध्द दोषसिध्द होऊ शकणार नाही.

१६) सदर खटल्यात फिर्यादी साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या सरतपासातच दिनांक २३/०३/२०१९ ते ०८/०४/२०१९ रोजी काय घटना घडली होती हे त्यांना आठवत नसल्याचे तसेच त्यांनी फिर्याद दाखल केली होती किंवा कसे हे त्यांना आठवत नसल्याचे तसेच आरोपी हा त्यांचा पाठलाग करत होता व त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होता व त्यांचा हात ओढुन त्यांना लज्ञा वाटेल असे कृत्य केले होते असे काही झाले नसल्याचे तसेच त्यांना फिर्यादीतील मजकूर माहित नसल्याचे तसेच फिर्याद दाखल केल्यानंतर त्यांनी न्यायालयात जबाब दिला होता किंवा कसे हे त्यांना आठवत नसल्याचे व सदर जबाबातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे कथन केलेले आहेत. तसेच साक्षीदार क्र. ३ व ४ यांनी त्यांच्या सरतपासातच दिनांक २३/०३/२०१९ व दिनांक ०८/०४/२०१९ रोजी काय घटना घडल्या होत्या हे त्यांना आठवत नसल्याचे तसेच पोलिसांनी त्यांचा जबाब घेतल्याचे परंतु त्या जबाबातील मजकूर त्यांना आठवत नसल्याचे तसेच आरोपी हा त्यांच्या मुलीचा पाठलाग करत होता व आरोपीने त्यांच्या मुलीचा हात पकडून त्यांच्या मुलीला लज्ञा वाटेल असे कृत्य केले होते असे काहीही झाले नसल्याचे कथन केलेले आहेत. सदर प्रकरणातील साक्षीदार क्र. १ हे घटनास्थळावरील पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. सदर चारही साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नसल्यामुळे अभियोगपक्षाद्वारे त्यांची उलटतपासणी घेण्यात आली व त्यात त्यांनी त्यांच्यात व आरोपीमध्ये तडजोड झाल्याचे मान्य केलेले आहे. साक्षीदारांनी जबाब स्वेच्छेने विनादबाव दिला आहे,

कोणताही तटस्थ किंवा स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध नव्हता, तडजोडीच्या पार्श्वभुमीवर खटला पुढे न नेण्याचे संकेत नसल्याने या नमुद मुद्दयांचा समतोल विचार केला आहे.

१७) मुळातच अभियोगपक्षाने सदर खटल्यामध्ये आरोपींविरुध्द दोषारोपपत्र सिध्द करण्याइतपत कोणताच पुरावा आणलेला नाही. तसेच अभियोगपक्षाने भा.द.वि. कलम ३५४, ४५२ व ५०४ प्रमाणे मुलभुत घटक कोणत्याही पध्दतीने सिध्द केले नाही. सर्वप्रथम फिर्यादी, फिर्यादीचे वडिल व फिर्यादीची आई यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे तसेच सदर प्रकरणात तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविलेली नसल्यामुळे अभियोगपक्ष सदर प्रकरणात फिर्याद व घटनास्थळ पंचनामा सिध्द करु शकलेला नाही. तसेच मुळ फिर्यादी यांनी (निशाणी क्रमांक २७) वर मुळ फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील रहिवाशी असुन त्यांचे नित्याचे एकमेकांशी संबंध येतात त्यांचा वैरभाव वाढु नये सलोखा निर्माण व्हावा याकरीता त्यांच्या गावातील प्रतिष्ठीतांच्या मध्यस्थीने आपसात समझोता झालेला आहे करीता फिर्यादीस आरोपीविरुध्द सदर खटल्याचे कामकाज चालविणे नाही तरी सदरचा खटला निकाली काढुन टाकण्यात यावा या आशयाची पुरसीस दाखल केलेली आहे. त्यामुळे हे न्यायालय अशा निष्कर्षाप्रत आले आहे की, या प्रकरणात आरोपींना दोषी ठरवण्यासाठी कोणताही कायदेशीर, वस्तुनिष्ठ व शंका राहील पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४</u>** :–

१८) प्रस्तुत खटल्यामध्ये मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी असल्यामुळे व "कोणताही निरपराध व्यक्ती शिक्षेस पात्र ठरु नये, जरी काही दोषी सुटले तरीही." या न्यायतत्वानुसार न्यायालयाने अत्यंत सावधगिरीने आणि साक्षपुराव्यांच्या कसोटीवर आरोपींना निर्दोष मुक्त करणे उचित होईल या निष्कर्षाप्रती आले आहे. सबब मुद्दा क्रमांक ४ च्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मी आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी **विष्णु देवराम गायकवाड,** यांना फौ.प्र. संहितेचे कलम २४८ (१)/भा.ना.सु.स. कलम २७१ (१) अन्वये भारतीय दंड विधानच्या कलम ३५४, ४५२ व ५०४ अंतर्गत गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ/भा.ना.सु.स. कलम ४८१ (१) अन्वये पुर्ततेकरीता रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका द्यावा. |
| ४. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अग्रेषित करण्यात आला. |

**स्वाक्षरीत/–**

(**मिलिंद आर. गाढवे**)

स्थळः– साक्री.
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री

दिनांकः– २३.०३.२०२६.
(न्यायालय क्रमांक २)

## परीशिष्ठ

**भाग क**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद (iii))**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | भगवांत तुळशीराम देवरे | घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच | **२३** |
| २. | सुनिता सुरसिंग अहिरे | फिर्यादी | **२८** |
| ३. | कमलबाई सुरसिंग अहिरे | फिर्यादीची आई | **३१** |
| ४. | सुरसिंग किसन अहिरे | फिर्यादीचे वडिल | **३२** |

**ब) बचावाचे साक्षीदार** – नाही.

**क) न्यायालयीन साक्षीदार** – नाही.

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन निशाणी**

**अ) अभियोग पक्ष न्यायालयीन निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | पि.सा.क्र. १/२४ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस |
| २. | पि.सा.क्र. २/२९ | फिर्यादीवरील सहीस |
| ३. | पि.सा.क्र. २/३० | सी.आर.पी.सी. कलम १६४ प्रमाणेचा जबाबावरील सहीस |

**ब) बचावपक्ष निशाणी** –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | ---- | ---- |

**क) न्यायालयातर्फे निशाणी** –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निशाणी क्रमांक १५ | दोषारोप |
| २. | निशाणी क्रमांक १४ | आरोपीचे निवेदन |

**ड) सामग्री वस्तु :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक/तपशिल |
|---|---|
| ..... | ............... |

**स्वाक्षरीत/-**
( **मिलिंद आर. गाढवे** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री
(न्यायालय क्रमांक २)

स्थळः- साक्री.
दिनांकः- २३.०३.२०२६

**– प्रमाणपत्र –**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– एच. बी. पिले,

न्यायालयाचे नांव :– न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग (कोर्ट क्र.२), साक्री.

पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक :– २५/०३/२०२६

सही/–
लघुलेखक (श्रेणी–३)